# फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

CIN : U45200MH1974SGC017206

**पंजिकृत कार्यालय :- एफडीसीएम भवन, ३५९-बी, हिंगणा रोड, अंबाझरी, नागपूर ४४००३६**

ई मेल : md@fdcm.nic.in दुरध्वनी क्र. ०७१२-२८११९०५ वेबसाईट : www.fdcm.nic.in


क्रमांक : प्रशा/आस्था-२/न.क्र.१५/प्र.क्र.१५/ 570 नागपूर, दिनांक 03 JUN 2024

## परिपत्रक

विषय : भविष्य निर्वाह निधीचा भरणा करतांना घ्यावयाची खबरदारी.

एफडीसीएम लिमिटेडमध्ये अधिकारी / कर्मचारी यांचे मासिक वेतनामधून १२% ईपीएफ कपात करण्यात येत असून सदरहू ईपीएफचा भरणा ऑनलाईन पद्धतीने विहीत मूदतीत करावयाचा असतो. परंतू सदरहू ईपीएफचा भरणा आपले कार्यालयाकडून विलंबाने होत असल्याने भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडून लाखामध्ये भुर्दंड आकारण्यात येत असल्याचे या कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे .

त्याअनूषंगाने सदरहू भूर्दंड टाळण्यासाठी भविष्य निर्वाह निधीचा भरणा करतांना प्रादेशिक तसेच विभागीय कार्यालयांनी खालील बाबींची पूर्तता करावी.

१. भविष्य निर्वाह निधीचा भरणा १० तारखेच्या आत करण्यात यावा.

२. भविष्य निर्वाह निधीचा भरणा करीत असताना Gross Wages म्हणून १५००० न घेता Gross Wages म्हणजे मुळ वेतन + महागाई भत्ता यांची बेरीज घेण्यात यावी.

३. भविष्य निर्वाह निधीचा भरणा करीत असतांना जी चालान upload करावी लागते, त्या चालानमध्ये Gross Wages वरच Administration Charges चा भरणा करण्यात यावा.

४. एखाद्या अधिकारी / कर्मचारी यांचे पदोन्नतीने पदस्थापना / स्थानांतरण दुसऱ्या कार्यालयात झालेले असल्यास त्यांचे अंतीम वेतन प्रमाणपत्र त्वरीत पाठविण्यात यावे, जेणेकरून संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचे वेतन अदा करण्यास विलंब होणार नाही तसेच भविष्य निर्वाह निधीचा भरणा वेळेत करण्यात येईल.

५. आपल्या कार्यालयातील सर्व अधिकारी / कर्मचारी तसेच क्षेत्रिय मजूरांचे विहीत वेळेमध्ये केवायसी अपडेट करण्यात यावी, जेणेकरून ईपीएफ चा भरणा करतांना कोणतीही अडचण भासणार नाही.

६. एखाद्या वेळेस आपल्याकडून ईपीएफ चा भरणा विहीत वेळेत झालेला असेल व ईपीएफओ कार्यालयाकडून सदरहू महिन्याचा भरणा विलंबाने झाल्याचे कळविले असेल, अशा वेळेस सदरहू भरणा आपल्याकडून विहीत वेळेत झालेला आहे का, तसेच बँकेकडून विलंब झालेला आहे का, हे तपासून घ्यावे. तसेच बँकेकडून विलंब झालेला असेल तर तसे ईपीएफओ कार्यालयाला पत्राद्वारे कळविण्यात यावे, जेणेकरून भूर्दंड टाळणे शक्य होईल.

७. प्रादेशिक व्यवस्थापक तसेच विभागीय व्यवस्थापक (सर्व) यांना सूचित करण्यात येते की, वरील सर्व बाबींचे काटेकोरपणे पालन करून भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडून कोणत्याही स्वरूपाचा भुर्दंड एफडीसीएम लिमिटेडवर पडणार नाही, याची दक्षता घ्यावी. जर एखादया वेळेस वरील बाबींचे पालन न केल्यास संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांची जबाबदारी सूनिश्चीत करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

(संजीव गौड)
**महाव्यवस्थापक** (मुख्यालय)

प्रति,
महाव्यवस्थापक,
नागपूर प्रदेश, नागपूर

प्रादेशिक व्यवस्थापक,
चंद्रपूर प्रदेश / नाशिक प्रदेश

विभागीय व्यवस्थापक (सर्व),
एफडीसीएम लिमिटेड

प्रत : एफडीसीएम संकेतस्थळ